# प्रेस नोट

**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**
**दि.१७.०५.२०२३**

आरोपी भगवान दशरथ कुंभार,वय ४५ वर्ष,व्यवसाय– खाजगी काम (बॅक ऑफ बडोदा बी.सी एजंन्ट) रा.बाबंरूड राणीचे ता.पाचोरा जि.जळगांव **(खाजगी इसम)** यांनी १३६०/–रुपये लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद कंमाक** | :– | पाचोरा पो.स्टे. गु.र.नं.१५५/२०२३ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम– ७ अ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | आरोपी भगवान दशरथ कुंभार वय ४५ वर्ष, व्यवसाय खाजगी काम (बॅक ऑफ बडोदा बी.सी एजंन्ट) रा.बाबंरूड राणीचे ता.पाचोरा जि.जळगांव **(खाजगी इसम)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१७/०५/२०२३ रोजी<br>१३६०/–रु.लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | १३६०/– रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१७/०५/२०२३ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | फिर्यादी यांची आई वयोवृद्ध असल्याने फिर्यादी हे एकटेच दिनांक १६/०५/२०२३ रोजी बाबंरूड ता.पाचोरा येथील तलाठी कार्यालयात गेले असता त्याठीकाणी तलाठी सुनिल जयसिंग राजपुत व त्याचे हाताखाली काम करणारे भगवांन कुंभार यांची भेट झाली त्यावेळी भगवान कुंभार यांनी काय काम आहे याबाबत विचारणा केली असता फिर्यादी यांनी आईच्या नावे असलेल्या शेतीवर बॅक ऑफ बडोदा,शाखा सामनेर ता.पाचोरा याचे कडुन रू. १,३०,०००/– एवढे पीक कर्ज मजुंर झाले असुन पीक कर्जाची नोंद (बोजा) ही ७/१२ उताऱ्यावर करणे आहे. त्यावेळी भगवान कुभांर यांनी फिर्यादी यांचे कडील मजुंर कर्जाची कागदपत्रे पाहुन फिर्यादी यांना तुम्हाला जर शेतीच्या ७/१२ उताऱ्यावर लवकरात लवकर नोंद (बोजा) करावयाची असेल तर त्यासाठी मला १३६०/– रू द्यावे लागतील पैसे दिल्यावर मी तलाठी आप्पा यांचे कडून नोंद तयार करून आणुन देतो असे सागुन भगवान कुंभार यांनी फिर्यादी यांना एका कोऱ्या कागदावर नोंदी साठी लागणारे आईचे दोन पासपोर्ट फोटो,आधाकार्ड व एक साक्षीदाचे आधार कार्ड असे लिहुन त्याखाली १३६०/– रूपये लिहुन दिले असता फिर्यादी यांनी ऐवढे पैसे कशासाठी लागतात त्यावेळी भगवान कुंभार यानी तुमचे काम तलाठी आप्पा कडुन करून आणावे लागेल त्यासाठी एवढा खर्च लागतो असे सागितले.त्यावेळी फिर्यादी यांना ७/१२ उताऱ्यावर पीक कर्जाची नोद घेण्यासाठी ऐवढे पैसे लागत नाही. भगवान कुंभार हे तलाठी आप्पा यांचे नाव सागुन पैशांची मागणी करीत आहे हे लक्षात आल्यावर फिर्यादी यांनी भगवान कुंभार यांना आता माझे कडेस पैसे नाहीत मी नंतर येवुन भेटतो असे सांगुन निघुन आले होते.सदरबाबत फिर्यादी यांनी दि.१७/०५/२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव येथे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची ला.प्र.वि.जळगाव पथकाने दोन पंचासमक्ष दि.१७/०५/२०२३ रोजी पडताळणी केली असता भगवान कुंभार यांनी फिर्यादी यांचे आईच्या नावे असलेल्या शेतीवर बॅक ऑफ बडोदा,शाखा सामनेर ता.पाचोरा याचे कडुन रू.१,३०,०००/– एवढे पीक कर्ज मजुंर झाले असुन सदर पीक कर्जाच्या (बोजा) नोंद ही राणीचे बांबरूड गावचे तलाठी अप्पा यांचे कडुन ७/१२ उताऱ्यावर लावुन आणून देतो असे सागुन बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी तलाठी कार्यालय, राणीच बांबरूड येथिल लोकसेवकावर प्रभाव असल्याचे दर्शवुन भगवान दशरथ कुंभार वय ४५ वर्ष,व्यवसाय खाजगी काम (बॅक ऑफ बडोदा बी.सी एजंन्ट) रा.राणीचे बाबंरूड ता.पाचोरा जि.जळगांव यांनी फिर्यादी यांचे कडुन १३६०/–रुपये रक्कमेची मागणी करुन वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री कंमाक:–** 1064,दुरध्वनी **कंमाक:–**0257-2235477

**व्हॉटसअॅप कंमाक:–** 8766412529

17.05.2023

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव